शुक्रवार दि. १४ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३४४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंह बादल यांच्यावर नांदेडमध्ये हल्ला

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे चौकशीचे आदेश

**नांदेड - प्रतिनिधी**

शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख आणि पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंह बादल यांच्यावर नांदेडमध्ये हल्ला करण्यात आला. बादल यांच्च्यावरील हल्ला नांदेडमध्ये गुरद्वाराजवळ झाला, त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. या हल्ल्या संदर्भात एक व्हिडिओ समोर आला असून त्यामध्ये बादल यांना एका इमारतीत नेण्यात येत असल्याचं दिसतं,याशिवाय बादल यांच्या उजव्या हाताला कापड बांधलेलं देखील दिसतं. नांदेडमधील तख्त श्री हजूर साहिब येथे सुखबीर सिंह बादल त्यांची पत्नी खासदार हरसिमरत कौर बादल यांच्यासह काल गेले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ( ) यांनी सुखबीर सिंह बादल यांच्यावरील हल्ल्यासंदर्भात पोलीस अधीक्षकांकडून माहिती घेतली आहे. याशिवाय मुख्यमंत्र्यांनी सुखबीर सिंह बादल यांच्यासोबत फोनवर चर्चा केली असल्याची माहिती समोर आली आहे.
पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीरसिंह बादल यांच्यावर नांदेड येथे झालेल्या हल्ल्याच्या घटनेची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड पोलीस अधीक्षक यांच्याकडून माहिती घेतली आहे. या घटनेत आरोपीला तात्काळ अटक केली असून कोणत्या उद्देशाने हा हल्ला झाला, याची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.सुखबीर सिंह बादल यांची प्रकृती चांगली आहे, असल्याची माहिती देखील देण्यात आली आहे. पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीरसिंग बादल याच्यावर हल्ला करणारा व्यक्ती वकील आहे. आरोपी जसपालसिंग याचं वय ६२ वर्ष आहे.

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

**जालना - प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहेत. पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता शासकीय विश्रामगृह छत्रपती संभाजीनगर येथून जालनाकडे प्रयाण करतील. सकाळी १०.०० वाजता आगमन व एमआयडीसी फेस वन छत्रपती संभाजीनगर चौफुली- जालना येथील भाजपा जिल्हा कार्यालय नवीन इमारत भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थिती राहतील. त्यानंतर सकाळी ११.०० वाजता रेशीम कोष बाजारपेठ, नवीन इमारत, सिरसरवाडी रोड, जालना येथे रेशीम कोष बाजारपेठ इमारतीच्या लोकार्पण कार्यक्रमास उपस्थित राहतील. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत, रांजणी,राणी उंचेगाव, पिंपरखेड बु. दुधना काळेगाव, हसनाबाद, शहागड, वाकुळणी येथील सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिष्ज्ञद, लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहतील. दुपारी १.०० वाजता जालना येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील. दुपारी २.०० वाजता महात्मा फुले चौक औरंगापुरा छत्रपती संभाजीनगर येथे आगमन व मुख्यमंत्री महोदयांच्या हर घर तिरंगा अभियान रॅलीत सहभागी होतील. सायंकाळी ५.०० वाजता छत्रपती संभाजीनगर येथून जालनाकडे प्रयाण करतील. सायंकाळी ६.०० वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथे आगमन व राखीव. शनिवार, दि. १५ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथील भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजीत शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर सकाळी ९.३५ वाजता शासकीय वाहनाने परळी वैजनाथ जिल्हा बीडकडे प्रयाण करतील.



# संपादकीय...

## डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

अलीकडेच भारताने डिजिटल क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक एतिहासिक पाऊल टाकले. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.

या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय ॲप्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात. आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय ॲप्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्ड सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात. विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील.

# आमदार रोहित पवार यांची जिल्हाधिकाऱ्यांसोबत मॅरेथॉन बैठक

## कर्जत–जामखेड मतदारसंघातील प्रलंबित विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा

**अहिल्यानगर - प्रतिनिधी**

कर्जत-जामखेड मतदारसंघातील प्रलंबित असलेल्या विविध प्रश्नांसंदर्भात आमदार रोहित पवार यांनी अहिल्यानगरमध्ये जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्यासह सर्व विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांसोबत चार तास प्रदीर्घ बैठक घेतली. यावेळी रस्त्यांची संथगतीने सुरु असलेली कामे, निकृष्ट कामांची चौकशी, वीजपुरवठ्याबाबतच्या तक्रारी, शासकीय इमारतींची रद्द झालेली कामे, कर्जत-जामखेड शहरातील अस्वच्छता, पाणीपुरवठ्याच्या कामाच्या तक्रारी, वाढती गुन्हेगारी आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली. तसेच प्रलंबित विषय तातडीने मार्गी लावण्याच्या आणि तक्रार असलेल्या कामांबाबत चौकशी करुन कारवाई करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. यावेळी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्यासह इतर सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. तालुका स्तरावर सातत्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन जनहिताचे प्रश्न मार्गी लावण्याचा आमदार रोहित पार यांचा सातत्याने प्रयत्न असतो. परंतु काही विषय हे जिल्हा पातळीवरील असल्याने या प्रश्नांसंदर्भात त्यांनी बुधवारी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मॅरेथॉन बैठक घेतली. तब्बल ४ तास चाललेल्या या बैठकीची जोरदार चर्चा आहे.

कोणतेही कारण न देता मतदारसंघातील २३९ पाणंद रस्ते रद्द करण्यात आले आहेत तर रोजगार हमी योजनेतून कर्जत तालुक्यात १५२० आणि जामखेड तालुक्यात ९३० विहिरी मंजूर झाल्या असतानाही केवळ कामे सुरु न केल्याने त्या रद्द करण्यात आल्या. यावर आमदार रोहित पवार यांनी बैठकीत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. बळीराजा शेतपाणंद रस्ते योजनेअंतर्गत मतदारसंघातील ११६८ रस्त्यांचा प्रस्ताव पाठवला मात्र केवळ ३५ कि. मी. अंतरावरील रस्त्यांनाच मंजुरी देण्यात आली असून उर्वरित ११३३ रस्त्यांनाही निधी मंजूर करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांना जमिन मोजणीच्या कामांना विलंब होत असल्याने ती तातडीने करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. सिद्धटेक येथील सभामंडपाच्या कामकाजात येणारे अतिक्रमण हटवणे, पोटखराबा जमीन लागवडीयोग्य नोंदणी करण्यास



३-३ वर्षे होणारा विलंब, पिक विमा योजनेतील शेतकऱ्यांच्या तक्रारी, रेशनकार्ड धारकांचे प्रश्न आणि इष्टांक वाढवून मिळणे, निमगाव गांगर्डा, पाटेगाव, चापडगाव, आंबी जळगाव आणि कुळधरण येथील तलाठी कार्यालयांना जागा उपलब्ध न झाल्याने ही कामे रद्द झाली, या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. औटेवाडी येथील ग्रामस्थांना शिल्लक प्लॉट उपलब्ध करून देण्याचा विषय, कुकडी डावा कालवा प्रकल्पासाठीच्या भूसंपादनाचे प्रलंबित ४७ प्रस्ताव, खैरी प्रकल्पाच्या कालवाग्रस्त शेतकऱ्यांचा प्रलंबित मोबदला तातडीने देणे, कर्जत शहरातील अस्वच्छता, रमाई आवास योजनेतील घरकुलांचा प्रश्न, व्यापार संकुलातील गाळ्यांची सुरक्षा, भटके कुत्रे व मोकाट जनावरांचा होणारा त्रास, कर्जत शहरातील सीसीटीव्ही यंत्रणेचा विस्तार, कर्जत शहराचा पाणीपुरवठा, जामखेडमधील मलनिःस्सारण प्रकल्पाचे निकृष्ट बांधकाम आणि कामे न करता काढलेली बोगस बिले, कचरा डेपोमुळे जामखेडमधील आयटीआय मधील विद्यार्थ्यांना होणारा त्रास, शहरातील अस्वच्छता, जामखेड शहरातील व्यापारी संकुलासाठीचा वीजपुरवठा, लोकांना जन्म दाखल्यांसाठी ३-४ महिने करावी लागणारी प्रतीक्षा, मागील वर्षी अतिवृष्टीमुळे वाहून गेलेला खेड-शिंपोरा रस्त्यावरील नांदणी नदीवर नव्याने पुल उभारणे आणि तूर्तास आर्मी बेली ब्रीजची उभारणी या प्रत्येक विषयावर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली आणि कोणतेही कारण न देता हे विषय मार्गी लावण्याचा आग्रह यावेळी आमदार रोहित पवार यांनी धरला आणि तशा स्पष्ट सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या. जामखेड शहरातील महामार्गाचे काम अतिशत संथ गतीने सुरु आहे. श्रीगोंदा-जामखेड रस्त्याला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या आहेत. जलजीवन मिशन योजनेतील काही गावांमधील कामे ही निकृष्ट दर्जाची झाली आहेत. त्यामुळे कर्जत आणि जामखेड या दोन्ही तालुक्यातील संथ गतीने सुरु असलेली रस्त्यांची सर्वच कामे वेगाने आणि दर्जेदार करण्याच्या आणि निकृष्ट दर्जाच्या कामांची चौकशी करुन कारवाई करण्याचा सूचना या बैठकीत अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कमी असलेल्या ७४ शिक्षकांची तातडीने नेमणूक करण्याची मागणीही आमदार रोहित पवार यांनी यावेळी केली. यंदा पावसाला आधीच उशीर झाला असताना खते आणि बियाण्यांची साठेबाजी होऊन त्यांची चढ्या भावाने विक्री केली जाते. यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आणखी अडचणींचा सामना करावा लागतो. या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन साठेबाजी आणि चढ्या भावाने खते आणि बियाण्यांची विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

जामखेड तालुक्यातील काही तलाठी कार्यालयांची कामे निकृष्ट झाली असून १४ तलाठी कार्यालये सुरु होऊन बंद झाले तर ९ तलाठी कार्यालये अद्याप सुरुही झालेले नाहीत. कृषीच्या फिडरवर असलेल्या काही वाड्या वस्त्यांना सायंकाळी ६ ते १० या वेळेत अजूनही वीज मिळत नाही. सिंगल फेज वीज पुरवठ्यासंदर्भातील अनेक कामे प्रलंबित असून ते तातडीने पूर्ण करण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या. जळालेली रोहित्रे तातडीने बदलून मिळत नाहीत आणि सोलार योजनेतही अनेक अडचणी आहेत. त्या सोडवण्याबाबतही या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

या बैठकीत कायदा व सुव्यवस्थेबाबतही सविस्तर चर्चा झाली. कर्जत-जामखेड मतदारसंघात अनेक अवैध धंदे सुरु असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. तसेच खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रमाणही वाढत असल्याने निरपराध नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते, अशी चुकीची कामे पूर्णपणे बंद करण्याच्या सूचना त्यांना पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या. भरोसा सेलच्या माध्यमातून प्रभावी काम करता येते हे मागील काही काळात दिसून आले आहे. त्याअनुषंगाने हे काम अधिक चांगल्या प्रकारे करण्याच्या सूचनाही या बैठकीत देण्यात आल्या. कर्जत आणि जामखेड या दोन्ही शहरात विद्यार्थी-विद्यार्थीनींना कोणताही त्रास होऊ नये याची काळजी घेण्याच्यादृष्टीने पोलिसांची गस्त वाढवण्याच्या आणि बस स्थानकावर सीसीटीव्ही लावण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. शिवाय पोलिस विभागासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची मागणीही यावेळी पोलिस अधीक्षकांकडे करण्यात आली.

''माझ्या कर्जत-जामखेड मतदारसंघात तालुका पातळीवर सातत्याने अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन जनहिताचे निर्णय मार्गी लावण्याचा माझा सातत्याने प्रयत्न असतो, पण जे प्रश्न वरिष्ठ पातळीवर सोडवायचे असतात त्या विषयांसाठी जिल्हाधिकारी पंकज आशिया साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत अहिल्यानगर इथं बैठक झाली. या बैठकीला इतर सर्व विभागांचे प्रमुख अधिकारीही उपस्थित होते. या बैठकीत रस्ते, पाणीपुरवठा, पीक विमा, सार्वजनिक विकास कामे व वैयक्तिक लाभार्थ्यांचे विषय, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न, वीज पुरवठ्याबाबची अडचण, खते आणि बियाण्यांचा काळाबाजार, सार्वजनिक हिताच्या कामांमध्ये न पाळली जाणारी गुणवत्ता आदी प्रत्येक विषयावर सविस्तर चर्चा झाली आणि हे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याबाबत सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. सर्वच अधिकारी हे चांगलं काम करण्याचा प्रयत्न करत असून काम करताना त्यांना येणाऱ्या अडचणींवरही यावेळी चर्चा झाली. अपेक्षा आहे की, पुढील काही दिवसांत हे सर्व प्रश्न वेगाने मार्गी लागतील''

## स्वतंत्र पुर्वकाळात युवा पिढीने स्वतंत्र्यासाठी लढा दिला;आता जेन-झी हक्कासाठी लढत आहे,यात त्यांना राजकारण नको न्याय हवा!

देशात जेन-झी आपल्या हक्कांसाठी लढत आहे आणि सरकार व पक्ष-विपक्ष स्वार्थासाठी राजकारण करीत आहे. आता युवा पिढी कोणतेही राजकारण खपवून घेणाच्या तयारीत नाही.कारण त्यांची सहनशीलता संपली असून आरपारच्या लढाईत असल्याचे दिसून येते.जेन-झीवर होत असलेला अन्याय फक्त जंतरमंतर किंवा नीट किंवा झारखंड पुरता सिमीत रहाला नसून हा संपूर्ण देशभरातील जेन-झीवर होत असलेल्या अन्यायाविरूद्धचा मोठा लढा आहे.याची जाणीव सरकारने,पक्ष-विपक्षांनी व राजकारण्यांनी ठेवली पाहिजे.देशातील प्रत्येक राज्यात कोणत्या-ना-कोणत्या विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला दिसुन येतो याचे जिवंत उदाहरण देशाच्या १४५ कोटी जनतेच्या डोळ्यांपुढे आहे.त्यामुळे सर्वच राज्यातील भ्रष्ट नितीचा उलगडा करण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये तुकाराम मुंढे सारखे कर्तव्यनिष्ठ प्रशासकीय अधिकारी (मुख्य सचिवपदी) असने आवश्यक आहे आणि याचे स्वागत सर्वच स्तरातून होईल. कारण शिक्षण,आरोग्य,खानपान, महागाई, रोजगार या संपूर्ण ठिकाणी भ्रष्टाचाराची किड लागली आहे.या भ्रष्ट नितीचा नायनाट करण्यासाठी जेन-झीचा उदय झाला.आज जेन-झी जंतरमंतर पासून तर झारखंड पर्यंत आणि झारखंड पासून संपूर्ण देशात जेन-झी आपल्या हक्कांसाठी संपूर्ण शक्तीनिशी संघर्ष करीत आहेत.जंतरमंतर वर नीट पेपर फुटीसाठी आंदोलन झाले;तर झारखंडमध्ये ढासळती शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी आंदोलन सुरू आहे.परंतु यात सर्व विद्यार्थांचा एक उद्देश आहे की,राज्यासह देशातील शिक्षण व्यवस्था पारदर्शक, स्वच्छ आणि सुरक्षित रहाली पाहिजे व विद्यार्थ्यांच्या परीश्रमाला आणि मेहनतीला यश यावे हाच उद्देश देशातील युवा पिढीचा आहे त्यासाठीच राज्यात किंवा देशात युवा पिढी आंदोलन करतांना दिसतात. आपण पहाले की, जंतरमंतरवर विद्यार्थ्यांचे तब्बल ३५ दिवस आंदोलन चालले यात सोनम वांगचूक यांनी २० दिवस उपोषण सुध्दा केले यानंतर विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर त्यांनी उपोषण मागे घेतले. आंदोलनादरम्यान लाठीचार्ज,पायलट गनचा वापर, बिहारमध्ये एके-४७ चा वापर अशा प्रकारे बळाचा वापर करण्यात आला व शेवटी धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला व ३६ व्या दिवशी जंतरमंतरवरील आंदोलन समाप्त झाले.या आंदोलनात संपूर्ण विपक्ष एकत्र झालेला आपण पाहिला.कारण केंद्र सरकारने सांगितले की, राजीनामा पध्दत आमच्या सरकारमध्ये नाही.अशाप्रकारचे सत्तेचे घमंड केंद्र सरकारला असल्याने सरकार झुकायला तयार नव्हते.परंतु जेन-झी ची आक्रमकता व संपूर्ण एकवटलेला विपक्ष पाहून शेवटी धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला.यानंतर पंजाबमध्ये पेपर फुटीप्रकरण उघडकीस आले यात भाजपने पंजाब सरकारला घेरने सुरू केले व विरोधकांवय वार-प्रतीवार सुरू झाला. यानंतर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला झारखंडमध्ये सुरुवात झाली.झारखंडमध्ये गैरभाजपा सरकार असल्याने झारखंडच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ भाजपा संपूर्ण शक्तीनिशी उतरला व याचे पडसाद लोकसभेत सुध्दा दिसून आले.त्यामुळे आता केंद्र सरकार विरोधकांना विचारत आहे की,आपण झारखंडच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या दरम्यान चुप का? असे अनेक प्रश्न झारखंडमधील विरोधी पक्ष भाजप व केंद्र सरकार , विरोधकांना व झारखंड सरकारला विचारत आहे.परंतु जंतरमंतरवरील आंदोलन असो अथवा पंजाब मधील आंदोलन असो अथवा झारखंडमधील विद्यार्थ्यांचे आंदोलन असो यावर तोडगा काढायला कोणीही तयार नाही. कारण केंद्र सरकारला ज्या राज्यात त्यांची सरकार नाही त्या राज्यात त्यांना राजकारण करायचे आहे;तर विरोधकांना भाजप शासीत प्रदेशात व केंद्र सरकारच्या विरूद्ध राजकारण करून आपापला हेतू साध्य करण्यासाठी लागले आहेत.अशा घाणेरड्या व घृणास्पद राजकारणामुळे युवा पिढीचे मोठ्या प्रमाणात भविष्याचे नुकसान होत आहे.याकरीता देशातील संपूर्ण राजकारण्यांनी (पक्ष-विपक्ष) यांनी एकत्र येऊन जेन-झी च्या मागण्यांवर गांभीर्याने विचार करायला पाहिजे.पक्ष-विपक्ष स्वतःच्या स्वार्थासाठी कितीही राजकारण करीत असले तरी आता जेन-झी थांबणार नसल्याचे दिसून येते.

पान ४ वरुन...

**सोलार प्लेटच्या...**

दोन स्वतंत्र तपास पथके तयार करण्यात आली. तपासाची जबाबदारी पोलीस उपनिरीक्षक मच्छींद्र वाघ यांच्याकडे सोपविण्यात आली.

गोपनीय माहिती अन तांत्रिक विश्लेषणातून आरोपी जाळ्यात

गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी परिसरातील माहिती संकलित करण्याबरोबरच तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेतला. गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीची पडताळणी करत पोलिसांचे तपास पथक संशयितांपर्यंत पोहोचले. या तपासातून गौरव गणेश पाटेकर (२६, व्यवसाय गोडाऊन इंचार्ज, रा. बठाण, ता. जि. जालना; सध्या रा. गोकुळधाम सोसायटी, इंदेवाडी, जालना) आणि विकास राजेभाऊ पांडुळे (२३, रा. उटवद, ता. जि. जालना) यांची नावे समोर आली. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान त्यांनी गुन्ह्यात सहभाग असल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. ३४ सोलार पॅनलसह पंपसेट, कंट्रोलरही जप्त आरोपींकडून चोरीस गेलेल्या साहित्यापैकी मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या साहित्यामध्ये ३४ सोलार पॅनल ३ लाख ५७ हजार रुपये ४ कंट्रोलर ४८ हजार रुपये २ पंपसेट ४३ हजार ५०० रुपये ४ केबल १८ हजार रुपये ४ फास्टनर बॉक्स ७ हजार रुपये ५ पॅनेल पुलिंग २ हजार ८०० रुपये ३ रस्सी बंडल ३ हजार रुपये ५ अर्थिंग रॉड ५०० रुपये २ मेन राफ्टर ३ हजार ४०० रुपये असा एकूण ४ लाख ८३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. चोरी गेलेल्या एकूण साहित्यापैकी किती मुद्देमाल अद्याप मिळणे बाकी आहे, याचाही तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. गोडाऊन इंचार्जच आरोपी असल्याने तपासाला महत्त्व या प्रकरणातील आरोपींपैकी एक जण संबंधित गोडाऊनचा इंचार्ज असल्याने या घरफोडीच्या गुन्ह्याच्या तपासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गोडाऊनमधील साहित्याची माहिती, साठवणूक, प्रवेश व्यवस्था आणि चोरी गेलेल्या साहित्याच्या हालचालींबाबत आरोपींना माहिती असण्याची शक्यता तपासात तपासली जात आहे. चोरीच्या साहित्याची विल्हेवाट लावण्यासाठी आणखी कोणाचा सहभाग होता का, याचाही तपास सुरू आहे. तसेच गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणावर सोलार प्लेट व पंपसेटचे साहित्य साठवलेले असताना सुरक्षेच्या कोणत्या उपाययोजना होत्या, मागील गेटची सुरक्षा कशी होती आणि चोरी नेमकी कोणत्या दिवशी झाली, याचाही तपास करण्यात येत आहे. आणखी आरोपी किंवा चोरीचा मुद्देमाल उघड होणार? पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून ४.८३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला असला तरी तपास अद्याप सुरू आहे. चोरी गेलेल्या उर्वरित साहित्याचा शोध, चोरीच्या मालाची संभाव्य विक्री किंवा विल्हेवाट आणि या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस उपनिरीक्षक मच्छींद्र वाघ करीत आहेत. त्यामुळे या प्रकरणातून आणखी काही धागेदोरे समोर येण्याची शक्यता आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक मच्छींद्र वाघ, पोहेकॉ सचिन चौधरी, पोहेकॉ/सदा राठोड, पोलीस कॉन्स्टेबल मतीन शेख, इम्रान खान, दिलीप गायकवाड आणि समाधान लंबे यांच्या पथकाने या कारवाईत सहभाग घेतला. घरफोडीचा तपास वेगाने पूर्ण; मात्र उर्वरित मुद्देमालाचा शोध सुरू गोडाऊन फोडून मोठ्या प्रमाणावर सोलार प्लेट व संबंधित साहित्य चोरीला गेल्यानंतर अवघ्या काही दिवसांत पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेत मुद्देमालाचा मोठा भाग हस्तगत केला आहे. त्यामुळे कदीम जालना पोलिसांच्या तपास पथकाच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. मात्र, ८ लाख रुपयांच्या चोरीच्या तक्रारीच्या तुलनेत ४.८३ लाख रुपयांचा मुद्देमालच सध्या हस्तगत झाला असल्याने उर्वरित साहित्य कुठे गेले, त्याची विल्हेवाट कोणी लावली आणि या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याची उत्तरे पुढील तपासातून स्पष्ट होणार आहेत.

**न्यायालयाच्या आदेशानुसार...**

रंगनाथ वाहूळ, कैलास रंगनाथ साळवे आणि श्रावण बापूराव जाधव सर्व रा. कडवंची, ता. जि. जालना, हे सहभागी होणार आहेत. न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई आणि गायरान जमीन नियमानुसार नावे करण्याच्या मागणीवर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

**अंबड तालुका...**

अंबडप्रशांत पैठणे तालुका समन्वयक, अंबडशरद पावसे उपतालुकाप्रमुख, अंबडनाशेर शेख अल्पसंख्याक उपतालुकाप्रमुख, अंबडराम देठे सर्कल प्रमुख, रोहिलागडवैभव कामटे उपशहरप्रमुखसागर इंगळे उपशहरप्रमुखश्रीराम पोखरकर सर्कल प्रमुख, जामखेड अथर्व बोचरे सर्कल प्रमुख, साष्टपिंपळगाव नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर विश्वास व्यक्त करत आगामी काळात अंबड तालुक्यात शिवसेना व युवासेनेचे संघटन अधिक व्यापक करण्यासाठी जोमाने काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. युवकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत सामाजिक व विकासात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धारही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

**अंबड पंचायत...**

असेल, तर स्वच्छ भारत मिशनचा मूलभूत हेतू कसा साध्य होणार, असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. याप्रकरणी संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन स्वच्छतागृहाची दुरुस्ती करावी आणि ते पूर्ववत सार्वजनिक वापरासाठी खुले करून द्यावे, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते गजानन पुंजाराम मुळे यांच्याकडून करण्यात आली आहे

## जोगस यांच्या बॅनरवर ‘सभापती’ उल्लेखाने नवा पेच!‘

# हौशी कार्यकर्त्यांनी बॅनर लावला’सुजित जोगस यांची कबुली

### ‘यापुढे असे नाव टाकू नका’, पदाचा उल्लेख करायचा असेल तर संबंधित सभापतींचाच फोटो घ्या, कार्यकर्त्यांना जोगस यांच्या सूचना

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या कामकाजात नगरसेवकांच्या नातेवाईकांकडून होणारा कथित अनधिकृत हस्तक्षेप रोखण्यासाठी आयुक्त अंजली शर्मा यांनी जारी केलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी आता शहरातील एका अभिनंदन फलकामुळे चर्चेत आली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी राहुल लोणीकर यांची निवड झाल्याबद्दल लावण्यात आलेल्या बॅनरवर प्रा. सुजित जोगस यांच्या नावासमोर ‘सभापती विद्युत व शिक्षण, मनपा जालना शहर’ असा उल्लेख करण्यात आल्याचे समोर आले होते.या पदनामावरून प्रश्न उपस्थित होत असतानाच प्रा. सुजित जोगस यांनी याबाबत प्रतिक्रिया देत ‘‘हा बॅनर हौशी कार्यकर्त्यांनी लावला आहे. मी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत की, यापुढे अशा पद्धतीने माझ्या नावाचा उल्लेख करू नका. सभापती म्हणून उल्लेख करायचा असेल तर संबंधित सभापतींचाच फोटो घ्यावा,’’ अशी भूमिका स्पष्ट केली आहे.त्यामुळे आता या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले असून, बॅनरवरील पदनामाचा वापर अनवधानाने झाला की त्यामागे अधिकृत पदाचा गैरसमज निर्माण करणारी बाब होती, तसेच आयुक्तांच्या परिपत्रकातील निर्देश या प्रकरणाला कशा प्रकारे लागू होतात, याकडे लक्ष लागले आहे.राहुल लोणीकर यांची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शहरात विविध ठिकाणी अभिनंदनाचे फलक लावण्यात आले आहेत. त्यापैकी एका फलकावर प्रा. सुजित जोगस यांचे नाव देताना त्यांच्यासमोर ‘सभापती विद्युत व शिक्षण मनपा जालना शहर’ असा उल्लेख करण्यात आल्याचे सांगण्यात आले.या उल्लेखामुळे महापालिकेच्या पदनामाच्या अधिकृततेचा प्रश्न निर्माण झाला.कारण महापालिकेतील सभापतीपद हे केवळ राजकीय किंवा सामाजिक ओळख नसून ते महापालिकेच्या अधिकृत समिती रचनेशी संबंधित पद आहे. त्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या नावासमोर असे पदनाम वापरले असल्यास त्याचा अधिकृत आधार काय, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.मात्र या प्रकरणात प्रा. सुजित जोगस यांनी स्वतः




स्पष्टीकरण देत बॅनरवरील उल्लेखाबाबत जबाबदारी कार्यकर्त्यांकडे असल्याचे सांगितले आहे.प्रा. सुजित जोगस यांच्या प्रतिक्रियेनुसार, संबंधित बॅनर त्यांच्या सांगण्यावरून अथवा अधिकृतरीत्या तयार करण्यात आलेला नसून काही हौशी कार्यकर्त्यांनी तो लावला.याबाबत त्यांनी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्याचेही सांगितले आहे.‘‘यापुढे असे नावाचा उल्लेख करू नका,’’ अशी सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना केल्याचे जोगस यांनी स्पष्ट केले. याहून महत्त्वाचे म्हणजे, ‘‘सभापती म्हणून उल्लेख करायचा असेल तर त्यांचाच फोटो घ्यावा,’’ असेही त्यांनी सांगितल्याने बॅनरवरील पदनामाचा उल्लेख योग्य नसल्याची त्यांची भूमिका स्पष्ट होते.त्यामुळे आता या स्पष्टीकरणानंतर महापालिका प्रशासनाची भूमिका काय राहते, हे महत्त्वाचे ठरणार आहे.महापालिका प्रशासनाच्या कामकाजात नगरसेवकांच्या नातेवाईकांचा अनधिकृत हस्तक्षेप रोखण्यासाठी आयुक्त अंजली शर्मा यांनी काही दिवसांपूर्वी कार्यालयीन परिपत्रक जारी केले होते. महापालिका मुख्यालय, प्रभाग कार्यालये आणि विकासकामांच्या ठिकाणी काही नगरसेवकांचे पती, पत्नी, वडील, मुले, भाऊ किंवा इतर नातेवाईक नियमितपणे वावरून प्रशासकीय कामकाजात हस्तक्षेप करत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आल्याचे त्यात नमूद करण्यात आले होते.निवडून आलेल्या अधिकृत नगरसेवक व नगरसेविकांनाच महापालिकेच्या कामकाजात सहभागी होण्याचा आणि प्रशासकीय निर्णय प्रक्रियेत आपले मत मांडण्याचा अधिकार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.परिपत्रकातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे काही व्यक्ती स्वतःला नगरसेवक असल्याचा भास निर्माण करत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आल्याचे नमूद करण्यात आले आहे. सामाजिक माध्यमे, सार्वजनिक व्यासपीठे, दूरध्वनीवरील संभाषणे किंवा महापालिका कार्यालयातील वावर यामध्ये स्वतःची ओळख नगरसेवक म्हणून करून देणे किंवा नगरसेवकांच्या अधिकारात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करणे, याबाबत प्रशासनाने गंभीर इशारा दिला आहे.यामुळेच जोगस यांच्या नावासमोर महापालिकेतील ‘सभापती’ पदनाम वापरण्यात आल्याने हा मुद्दा चर्चेत आला.मात्र येथे एक महत्त्वाचा फरकही लक्षात घेणे आवश्यक आहे. बॅनरवरील पदनामाचा उल्लेख हा स्वतः जोगस यांनी केला होता का, त्यांना त्याची पूर्वकल्पना होती का किंवा कार्यकर्त्यांनी स्वतंत्रपणे तो उल्लेख केला, याची वस्तुनिष्ठ पडताळणी होणे आवश्यक आहे.जोगस यांनी मात्र कार्यकर्त्यांनी हा बॅनर लावल्याचे सांगत भविष्यात अशी पुनरावृत्ती होऊ नये, अशा सूचना दिल्याचे स्पष्ट केले आहे.स्पष्टीकरणानंतर प्रशासन काय करणार?आता या प्रकरणातील मुख्य प्रश्न असा आहे की, महापालिका प्रशासन या बॅनरची अधिकृत नोंद घेणार का? बॅनरवरील पदनाम चुकीचे असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कारवाई होणार का? की जोगस यांनी स्वतःहून कार्यकर्त्यांना अशी पुनरावृत्ती टाळण्याच्या सूचना दिल्याने प्रशासन हे प्रकरण इथेच थांबवणार? याचे उत्तर आयुक्त अंजली शर्मा यांच्या भूमिकेवर अवलंबून राहणार आहे.विशेष म्हणजे, प्रशासनाने यापूर्वीच अनधिकृत बॅनर, होर्डिंग, पोस्टर आणि फलकांबाबत कठोर भूमिका घेतली आहे. त्यामुळे महापालिकेचे पदनाम वापरण्याच्या बाबतीत प्रशासन कोणता निकष लावते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.आयुक्तांच्या परिपत्रकाचा मुख्य उद्देश महापालिका प्रशासनातील अधिकारांची स्पष्ट विभागणी करणे आणि निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींव्यतिरिक्त इतर व्यक्तींचा अनधिकृत हस्तक्षेप रोखणे हा आहे.या पार्श्वभूमीवर बॅनरवरील एका पदनामामुळे निर्माण झालेला वाद हा केवळ राजकीय अभिनंदन फलकाचा विषय न राहता महापालिकेच्या अधिकृत पदांचा वापर आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सार्वजनिक ओळखीचा विषय बनला आहे.त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणात कारवाई करावीच, असा निष्कर्ष काढण्यापूर्वी संबंधित बॅनर कोणी तयार केला, पदनाम कोणी दिले, संबंधित व्यक्तीची त्यास संमती होती का आणि महापालिकेच्या कोणत्या नियमाचा भंग झाला आहे का, याची पडताळणी करणे आवश्यक आहे.प्रा. सुजित जोगस यांनी कार्यकर्त्यांना यापुढे असे पदनाम वापरू नये, अशा सूचना दिल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे त्यांच्या भूमिकेचा एक भाग स्पष्ट झाला आहे.

मात्र दुसरीकडे, महापालिकेच्या नावाने आणि पदनामाने बॅनर प्रसिद्ध झालाच कसा? हा प्रश्न कायम आहे.जर तो उल्लेख कार्यकर्त्यांनी केला असेल तर कार्यकर्त्यांनी तो कोणत्या आधारावर केला?त्यांना संबंधित व्यक्तीचे पदनाम चुकीचे असल्याची माहिती नव्हती का?आणि जर महापालिकेचे पदनाम अधिकृत नसेल, तर अशा उल्लेखावर प्रशासनाचा नियम काय सांगतो? हे प्रश्न आता प्रशासनाच्या स्पष्टीकरणातून स्पष्ट होणे अपेक्षित आहे.प्रशासनासाठी ‘टेस्ट केस’ ठरणार?आयुक्त अंजली शर्मा यांनी जारी केलेल्या परिपत्रकामुळे महापालिकेच्या कामकाजात लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या नातेवाईकांच्या भूमिकेबाबत स्पष्ट संदेश देण्याचा प्रयत्न झाला आहे.आता बॅनरवरील पदनामाचा मुद्दा समोर आल्यानंतर परिपत्रकाची अंमलबजावणी प्रत्यक्षात कशी होते, याची ही पहिलीच राजकीयदृष्ट्या संवेदनशील परीक्षा ठरू शकते.जोगस यांनी स्वतः कार्यकर्त्यांना सूचना केल्याचे सांगितल्यामुळे प्रशासनानेही वस्तुस्थिती तपासून निर्णय घेणे अपेक्षित आहे.कारवाई झाली तर नियम सर्वांसाठी समान असल्याचा संदेश जाईल; कारवाई झाली नाही तर ‘परिपत्रक फक्त कागदावरच?’ असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो.आता आयुक्तांसमोर चार थेट प्रश्न १. ‘सभापती विद्युत व शिक्षण, मनपा जालना शहर’ हे पदनाम प्रा. सुजित जोगस यांच्यासाठी अधिकृत आहे का? २. नसल्यास महापालिकेच्या पदनामाचा असा उल्लेख करणाऱ्या बॅनरची प्रशासन दखल घेणार का ३. जोगस यांनी कार्यकर्त्यांनी बॅनर लावल्याचे सांगितल्यानंतर त्यांची भूमिका प्रशासन कशी पाहणार? ४. नगरसेवकांच्या नातेवाईकांविषयी जारी केलेल्या परिपत्रकाची अंमलबजावणी राजकीयदृष्ट्या संवेदनशील प्रकरणातही तितक्याच काटेकोरपणे होणार का?या संपूर्ण प्रकरणात सध्या उपलब्ध असलेली महत्त्वाची बाब म्हणजे बॅनरवरील पदनामाबाबत जोगस यांनी स्वतः स्पष्टीकरण दिले असून, भविष्यात असा उल्लेख करू नये, अशा सूचना कार्यकर्त्यांना केल्याचे सांगितले आहे. त्यामुळे कोणावरही चुकीचा आरोप करण्याऐवजी आता महापालिका प्रशासनाने वस्तुस्थिती तपासणे महत्त्वाचे आहे.कारण हा वाद केवळ एका अभिनंदन फलकापुरता मर्यादित नाही.महापालिकेचे पद कोणाचे? अधिकार कोणाचे? आणि सार्वजनिक जीवनात त्या पदाची ओळख कोण वापरू शकते?या तीन प्रश्नांची स्पष्टता झाली, तर आयुक्तांच्या परिपत्रकाचा खरा उद्देशही अधिक स्पष्ट होईल.आता पाहायचे एवढेच आयुक्तांचे परिपत्रक ‘सर्वांसाठी समान’ ठरते का?

---

## मावळ तालुक्यातील दरडग्रस्त गावांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने गतीने कार्यवाही करावी- मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील

**मुंबई - प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील पाटण परिसरात अतिवृष्टीमुळे भूस्खलनाची घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर दरडग्रस्त तसेच दरडप्रवण गावांतील नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पुनर्वसनाची कार्यवाही गतीने पूर्ण करावी, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिले. मंत्रालयात मावळ तालुक्यातील दरडग्रस्त व दरडप्रवण गावांच्या पुनर्वसनाबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सुनील शेळके,उपसचिव संजय इंगळे, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जीएसआयच्या पुणे विभागाचे मेगाचेझ तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मदत व पुनर्वसन मंत्री जाधव पाटील म्हणाले, ‘‘दरडप्रवण भागातील नागरिकांच्या जीवितास कोणताही धोका निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजनांसोबतच कायमस्वरूपी पुनर्वसनाची कार्यवाही प्राधान्याने करावी. धोकादायक ठिकाणी वास्तव्यास असलेल्या कुटुंबांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर व पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. मावळ तालुक्यातील दरडप्रवण क्षेत्रात येणाऱ्या गावांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे. संबंधित गावांची जीएसआयच्या वर्गवारीनुसार पाहणी करण्यात आली असून, काही गावांमध्ये पुनर्वसनासाठी आवश्यक जमीन व इतर बाबींची कार्यवाही पूर्ण झाली आहे. काही गावांचे पुनर्वसन प्रस्ताव मात्र अद्याप प्राप्त झालेले नसल्याचे बैठकीत निदर्शनास आले. दरडग्रस्त व दरडप्रवण गावांतील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे. पुनर्वसनासाठी आवश्यक जमीन, तांत्रिक अहवाल, सर्वेक्षण, प्रशासकीय मान्यता आणि निधीशी संबंधित प्रस्तावांची कार्यवाही कोणत्याही विलंबाविना पूर्ण करावी, असे निर्देश मंत्री जाधव पाटील यांनी दिले.

अतिवृष्टीच्या काळात दरडींचा संभाव्य धोका असलेल्या भागांवर प्रशासनाने सातत्याने लक्ष ठेवावे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ राबवून सुरक्षित, कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध पुनर्वसनाला प्राधान्य द्यावे, असेही मंत्री जाधव पाटील यांनी स्पष्ट केले.

---

## गुटखाबंदी म्हणजे माफियांचे भले: ५३१ कोटींच्या जप्तीमागे ५० हजार कोटींचा काळाबाजार

### कायदेशीर परवानगी देण्याची ॲड. महेश धन्नावत यांची आक्रमक मागणी

**मुंबई - प्रतिनिधी**

महाराष्ट्रात २०१२ पासून कागदावर असलेल्या गुटखाबंदीचे धोरण म्हणजे सामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळ आणि गुटखा माफियांसाठी अथांग संपत्ती कमावण्याचे संजीवनी वरदान ठरले आहे. राज्य सरकारने स्वतः जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, २०१२ ते २०२६ या काळात राज्यात तब्बल ५३०.९८ कोटी रुपयांचा अवैध गुटखा जप्त करण्यात आला, ९,९९२ एफआयआर () दाखल झाले, १०,२५४ कोर्ट केसेस नोंदवल्या गेल्या आणि वाहतूक करणारी २,२७३ वाहने जप्त करण्यात आली. परंतु हा तर केवळ हिमनगाचे एक टोक आहे! पोलिसांच्या आणि एफडीएच्या () या जप्तीवरून हे स्पष्टपणे सिद्ध होते की, जप्त केलेल्या मालाच्या तुलनेत १०० पटीने अधिक, म्हणजेच किमान ५० हजार कोटी रुपयांचा बेकायदेशीर गुटख्याचा काळाबाजार राज्यभरात बिनदिक्कतपणे सुरू आहे. गुटखाबंदीच्या नावाखाली पोलीस आणि प्रशासनाकडून केवळ कारवाईचे आकडे दाखवून जनतेच्या डोळ्यात धूळफेक सुरू असल्याचा घणाघाती आरोप करत ॲड. महेश धन्नावत यांनी ही ढोंगी बंदी तात्काळ उठवण्याची आक्रमक मागणी केली आहे. इतर राज्यांमध्ये गुटखा विक्री कायदेशीर किंवा मोकळीक असलेली असल्याने, शेजारील राज्यांतून महाराष्ट्रात दररोज शेकडो गाड्या गुटखा आणला जातो.

जर बंदी खरोखरच यशस्वी असती, तर दरवर्षी शेकडो कोटींचा गुटखा जप्तच झाला नसता. यावरून हे स्पष्ट आहे की बंदीमुळे गुटखा खाणे बंद झालेले नाही, उलट तो १० पटीने जास्त किमतीत काळ्या बाजारात विकला जात असून याचा संपूर्ण फायदा सिंडिकेट चालवणाऱ्या गुटखा माफियांना आणि भ्रष्ट साखळीला होत आहे. ॲड. धन्नावत यांनी ठामपणे मांडले की, ही बंदी उठवून महाराष्ट्रात गुटखा विक्रीस रीतसर परवानगी देणे हाच सार्वजनिक आरोग्य आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी एकमेव व्यावहारिक मार्ग आहे. बंदी उठल्यास काळ्या बाजारात चालणारी बेकायदेशीर विक्री आणि तस्करी एका फटक्यात संपुष्टात येईल.

---

## ४१ घातक शस्त्रांच्या साठ्यामागचे धागेदोरे राजस्थानपर्यंत; ‘इम्मु डॉन’सह तिघे पोलिसांच्या जाळ्यात

### पुरवठादारापासून अंतिम ग्राहकापर्यंत संपूर्ण साखळी उद्‌ध्वस्त करण्याचे उद्दिष्ट

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत विक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवण्यात आलेल्या ४१ घातक अवैध शस्त्रांच्या प्रकरणाचा तपास आता महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून राजस्थानपर्यंत पोहोचला आहे. तीन दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त केल्यानंतर फरार असलेला रेकॉर्डवरील आरोपी शेख इम्राण शेख सलीम ऊर्फ ‘इम्मु डॉन’ याच्यासह शस्त्रविक्रीचे नेटवर्क सांभाळत असल्याचा संशय असलेल्या अदील कलीम शेख याला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात एकूण तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, न्यायालयाने त्यांना १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

पोलिसांच्या तपासात या शस्त्रसाठ्याची खरेदी राजस्थानातील गंगरार, चित्तोडगड परिसरातून झाल्याची महत्त्वपूर्ण माहिती समोर आल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे जालन्यातील अवैध शस्त्रविक्रीचा हा प्रकार केवळ स्थानिक पातळीपुरता



मर्यादित नसून, त्यामागे आंतरराज्यीय पुरवठा साखळी असल्याचा संशय अधिक बळावला आहे. चित्तोडगडमधून जालन्यापर्यंत शस्त्रांचा प्रवास चंदनझिरा पोलिसांनी केलेल्या तपासानुसार, जप्त करण्यात आलेली शस्त्रे राजस्थानातून खरेदी करण्यात आल्याची माहिती आरोपींकडून मिळाली आहे. या शस्त्रांचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तीची ओळख आणि त्याची नेमकी भूमिका निश्चित करण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, राजस्थानातून शस्त्रांचे पार्सल ट्रॅव्हल्स बसच्या माध्यमातून महाराष्ट्रात आणण्यात आले. हे पार्सल छत्रपती संभाजीनगर किंवा सिल्लोड येथे न उतरवता फुलंब्री परिसरातील पाल फाटा येथे उतरविण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. त्यानंतर ‘इम्मु डॉन’ आणि माजेद शेख यांनी इर्टिगा वाहनातून हा शस्त्रसाठा जालन्यात आणल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. या संपूर्ण वाहतूक साखळीचा तपास आता पोलिसांनी हाती घेतला आहे. शस्त्रे कोणी पाठवली, ट्रॅव्हल्समधून पार्सल कोणी बुक केले, ते स्वीकारणारे कोण होते आणि राजस्थानपासून जालन्यापर्यंत या व्यवहारात कोणकोणाचा सहभाग होता, याचा शोध घेतला जात आहे.

या प्रकरणातील आरोपी शस्त्रांची वाहतूक करताना कॅमेऱ्यांची नजर टाळण्याच्या उद्देशाने मार्ग आणि उतरविण्याचे ठिकाण निवडत असल्याचे तपासात आढळून आल्याचा पोलिसांचा दावा आहे.

सिल्लोड आणि छत्रपती संभाजीनगर शहर परिसरात मोठ्या प्रमाणात कॅमेरे असल्याने तेथे शस्त्रांचे पार्सल उतरविण्याऐवजी पाल फाटा परिसराची निवड करण्यात आल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे आरोपींकडून वाहतुकीदरम्यान पोलिसांच्या नजरेत न येण्यासाठी विशेष खबरदारी घेतली जात होती का, याचाही तपास केला जात आहे. तपासात आणखी एक गंभीर बाब समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. आरोपी शस्त्रांची विक्री करण्यासाठी तालुका पातळीवर एजंट नेमून नेटवर्क उभे करीत असल्याचा संशय आहे. जालना शहरासह परतूर, जाफराबाद आणि भोकरदन परिसरातील काही संभाव्य शस्त्र खरेदी-विक्री करणारे व्यक्ती पोलिसांच्या रडारवर असल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे जप्त करण्यात आलेली ४१ शस्त्रे नेमकी कोणाला विकली जाणार होती, याचा शोध आता महत्त्वाचा ठरणार आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केवळ शस्त्रे जप्त करण्यापुरता मर्यादित न ठेवता पुरवठादार वाहतूकदार स्थानिक एजंट अंतिम ग्राहक अशा संपूर्ण साखळीचा शोध घेण्याच्या दिशेने तपास सुरू केला आहे. या तपासादरम्यान आणखी एक धक्कादायक बाब समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. मागील आठवड्यात कदीम जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नूतन वसाहत परिसरात अजय आढाव यांची हत्या झाली होती. या हत्येत वापरण्यात आलेले धारदार खंजरही याच टोळीने विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचा पोलिसांचा दावा आहे.

त्यामुळे ४१ अवैध शस्त्रांच्या साठ्याचा तपास आता जालना शहरातील इतर गंभीर गुन्ह्यांशी जोडला जातो का, याकडे पोलिसांचे लक्ष आहे. अटक आरोपींकडून याबाबत सखोल चौकशी केली जात असून, याच नेटवर्ककडून यापूर्वी आणखी किती शस्त्रे पुरविण्यात आली होती, याचाही तपास केला जात आहे.

अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींना तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक रवि देशमाने यांनी न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने आरोपींना १७ ऑगस्टपर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे. दरम्यान, आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली इर्टिगा कार आणि शस्त्रविक्रीचे नेटवर्क चालविण्यासाठी वापरलेले मोबाईल फोन पोलिसांनी जप्त केले आहेत. या मुद्देमालाची एकूण किंमत ७ लाख ३५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. मोबाईल फोनमधील संपर्क, कॉल रेकॉर्ड, संदेश आणि इतर डिजिटल माहितीच्या आधारे शस्त्रविक्रीच्या नेटवर्कमधील आणखी व्यक्तींचा शोध घेण्याच्या दृष्टीने तपास सुरू आहे.

राजस्थानातील शस्त्रविक्रेत्याचा शोध

या प्रकरणात सर्वात महत्त्वाचा तपासाचा धागा राजस्थानातील चित्तोडगड परिसरातील शस्त्रविक्रेत्यापर्यंत पोहोचला आहे. आरोपींनी तेथून शस्त्रे खरेदी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून, संबंधित व्यक्तीची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.

या व्यक्तीचा जालन्यातील आरोपींशी संपर्क कसा झाला, किती काळापासून शस्त्रांची खरेदी-विक्री सुरू होती, यापूर्वी किती शस्त्रे महाराष्ट्रात पाठविण्यात आली आणि महाराष्ट्रातील आणखी कोणत्या शहरांमध्ये त्याचा पुरवठा झाला आहे, या प्रश्नांची उत्तरे आता तपासातून शोधली जात आहेत. ‘इम्मु डॉन’च्या अटकेने तपासाला नवी दिशा या गुन्ह्यातील फरार आरोपी शेख इम्राण शेख सलीम ऊर्फ ‘इम्मु डॉन’ याची अटक पोलिसांसाठी महत्त्वाची मानली जात आहे. शस्त्रविक्रीच्या नेटवर्कमध्ये त्याची नेमकी भूमिका काय होती, त्याचे राजस्थानातील संपर्क कोण आहेत, जालन्यातील कोणकोणत्या व्यक्तींशी त्याचे संबंध आहेत आणि त्याने यापूर्वी किती शस्त्रांचा व्यवहार केला, याचा तपास आता पोलीस कोठडीत केला जाणार आहे.

# सोलार प्लेटच्या गोडाऊनवर डल्ला; ४.८३ लाखांचा मुद्देमाल जप्त

## गोडाऊन इंचार्जसह दोघांना अटक, ३४ सोलार पॅनलसह पंपसेट व इतर साहित्य हस्तगत



**जालना । प्रतिनिधी**

सोलार प्लेट व पंपसेटच्या साहित्याने भरलेल्या गोडाऊनच्या मागील दरवाजाचे कुलूप तोडून करण्यात आलेल्या घरफोडीचा कदीम जालना पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणात गोडाऊन इंचार्जसह दोघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून ४ लाख ८३ हजार २०० रुपयांचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे गोडाऊनमधील साहित्याच्या सुरक्षिततेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. कदीम जालना पोलीस ठाण्याच्या पथकाने गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची दिशा निश्चित करत संशयितांपर्यंत मजल मारली. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या दोघांची चौकशी केल्यानंतर चोरीच्या गुन्ह्याचा उलगडा झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

**गोडाऊनच्या मागील दरवाजातून प्रवेश**

या प्रकरणातील फिर्यादी दीपक रंगनाथ भोंबे (वय ३६, व्यवसाय नोकरी, रा. कल्याणी पार्क फेज-२, पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर) यांनी १३ ऑगस्ट रोजी कदीम जालना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. भोंबे यांच्या तक्रारीनुसार, स्वामी विवेकानंद शाळेसमोर आणि जांगडे पेट्रोल पंपाजवळ असलेल्या स्पॅन पंप वेअर हाऊसच्या गोडाऊनमध्ये २ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेपासून ११ ऑगस्टदरम्यान अज्ञात चोरट्यांनी प्रवेश केला.

गोडाऊनच्या मागील गेटचा कडी-कोयंडा उचकटून चोरट्यांनी आत प्रवेश केला. त्यानंतर गोडाऊनमध्ये ठेवण्यात आलेल्या सोलार प्लेट व इतर साहित्यावर हात साफ केला. प्राथमिक तक्रारीनुसार चोरी गेलेल्या साहित्याची किंमत सुमारे ८ लाख रुपये असल्याचे नमूद करण्यात आले. यामध्ये प्रत्येकी सुमारे १४ हजार ३५ रुपयांच्या ५७ सोलार प्लेट्ससह इतर साहित्याचा समावेश होता.

**गुन्हा दाखल; दोन तपास पथके सक्रिय**

तक्रार मिळताच कदीम जालना पोलिसांनी गुरनं. ४४२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ), ३३१(३) आणि ३३१(४) नुसार गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत तपास पथकाला आवश्यक मार्गदर्शन केले. अज्ञात आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी *(पान २ वर)*

# विवेकानंद इंग्लिश स्कूल परतूर च्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश

**परतूर - प्रतिनिधी**

विवेकानंद सेवा केंद्र संचलित विवेकानंद इंग्लिश स्कूल, परतूरच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. शाळेचे तब्बल सात विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत.

यामध्ये नमन स्वप्निल मंत्री याने २५६ गुण मिळवून शिष्यवृत्ती परीक्षेत जालना जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविला असून, हिमांशी स्वप्निल मंत्री हीने २३८ गुण मिळवून जालना जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक



पटकावला आहे.

तसेच श्रेया कव्हळे ही जिल्ह्यातून बाविसावी , भक्ती मुंदडा ही जिल्ह्यातून तेविसावी , सई शिखरे ही जिल्ह्यातून पाचवी , शुभ्रा वायाळ ही जिल्ह्यातून नववी आणि बळीवंश भिसे हा जिल्ह्यातून ५७ वा या विद्यार्थ्यांनीही शिष्यवृत्ती मिळवत शाळेच्या यशात मोलाची भर घातली आहे.

या घवघवीत यशाबद्दल विवेकानंद सेवा केंद्राचे अध्यक्ष,संदीप दादा बाहेकर, विवेकानंद प्राथमिक तथा माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिंदे मॅडम, विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक, महाजन सर तसेच विवेकानंद पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक, विजयकुमार दंदाले सर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेतील शिक्षकवृंद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यात बाहेकर सर, बाहुटे सर, धुमाळ सर, पाठक सर, कुरुंदकर सर सहकार्य लाभले या यशात विद्यार्थ्यांची मेहनतीचा मोठा वाटा असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या यशामुळे विवेकानंद सेवा केंद्राच्या शैक्षणिक क्षेत्रातील गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

# शाळेच्या आवारातून धोकादायक विद्युत वाहिनी; बाल हक्क आयोगाची दखल

## महावितरण व शिक्षण विभागाला नोटीस; १९ ऑगस्टला मुंबईत सुनावणी

**जालना - प्रतिनिधी**

तालुक्यातील बरांजळा (लोखंडे) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणातून गेलेल्या धोकादायक विद्युत वाहिनीच्या प्रकरणाची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. शाळेच्या आवारातून उच्चदाबाची उघडी विद्युत वाहिनी गेली असून, जीर्ण झालेल्या तारांमधून वारंवार ठिणग्या पडत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याची तक्रार करण्यात आली होती. बळीराजा फाउंडेशनचे नारायण लोखंडे यांनी याबाबत आयोगाकडे तक्रार दाखल केली. शाळेच्या मुख्याध्यापकांनीही १२ जून २०२५ आणि ८ जुलै २०२६ रोजी महावितरण प्रशासनाकडे पत्रव्यवहार करून धोकादायक वाहिनी हटविण्याची किंवा सुरक्षित करण्याची मागणी केली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणात बालकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने आयोगाने महावितरणचे कार्यकारी अभियंता, भोकरदन आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जालना यांना प्रतिवादी केले आहे. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ तसेच बालहक्कांच्या अनुषंगाने प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे. आयोगाच्या आदेशानुसार १९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २ वाजता मुंबईतील महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या कार्यालयात सुनावणी होणार आहे.

संबंधितांनी कार्यवाही अहवाल तसेच प्रकरणाशी संबंधित मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सुनावणीस अनुपस्थित राहिल्यास कायद्यानुसार प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाही केली जाऊ शकते, असा इशाराही आयोगाने दिला आहे.

# अंबड तालुका युवासेना कार्यकारिणी जाहीर; नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी

**अंबड - प्रतिनिधी**

शिवसेना उपनेते आमदार अर्जुनभाऊ खोतकर साहेब व युवासेना सचिव अभिमन्यूदादा खोतकर यांच्या उपस्थितीत अंबड तालुका युवासेना कार्यकारिणी तसेच विविध आघाड्यांच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना संघटन बळकटीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेबजी घुगे, उपजिल्हाप्रमुख रावसाहेब पवार, जिल्हाकार्याध्यक्ष संतोष जेधे, युवासेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब इंगळे, अमोल भैया ठाकूर, लोकसभा प्रमुख गणेशदादा मोहिते, शिव उद्योग सहकार सेना जिल्हाप्रमुख दत्ता शिराळे, युवासेना उपजिल्हाप्रमुख दिलीप वाढेकर, तालुका प्रमुख महेश रायकर, युवासेना शहरप्रमुख रुद्र घुगे यांच्यासह शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने



उपस्थित होते.

यावेळी अंबड तालुक्यात शिवसेना व युवासेनेची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत करण्यासाठी युवकांना मोठ्या प्रमाणावर संघटनेशी जोडण्याचे आवाहन करण्यात आले. गावागावांत पक्षाची भूमिका व शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सक्रियपणे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**नवनियुक्त पदाधिकारी**

अविनाश शिंदे युवासेना जिल्हाकार्याध्यक्षविनोद जाधव युवासेना उपजिल्हा प्रमुख शोभाताई वाघराळ महिला आघाडी तालुकाप्रमुख, अंबडअय्युब बागवान अल्पसंख्याक तालुकाप्रमुख, अंबड लक्ष्मण गोडसे विधानसभा प्रमुख, अंबड संजय पडुळ तालुका संपर्कप्रमुख, अंबड गणेश समिंदर तालुका संघटक, अंबड हरिओम इंगळे तालुका सरचिटणीस, *(पान २ वर)*

# न्यायालयाच्या आदेशानुसार गायरान जमीन नावे करण्याची मागणी; कडवंचीतील नऊ जणांचे आजपासून आमरण उपोषण

**जालना - प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील मौजे कडवंची येथील सर्वे नं. ५, गट नं. १६ मधील गायरान जमिनीच्या ताब्याच्या प्रश्नावरून नवा वाद निर्माण झाला आहे. दिवाणी न्यायालय, जालना यांनी दिलेल्या निर्णयातील मनाई हुकुमाचा अवमान झाल्याचा आरोप करत संबंधित तत्कालीन तलाठी बी.एम.मोरे तसेच तत्कालीन तहसीलदार, जालना यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी कडवंची येथील नऊ नागरिकांनी केली आहे. या मागणीसाठी गुरुवार१३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजल्यापासून उपविभागीय अधिकारी कार्यालय,




जालना यांच्यासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. उपविभागीय अधिकारी, जालना यांना दिलेल्या निवेदनात उपोषणकर्त्यांनी म्हटले आहे की, मौजे कडवंची येथील सर्वे नं. ५, गट नं. १६ मधील गायरान जमिनीच्या ताब्याच्या संदर्भात दिवाणी न्यायालय, जालना यांनी आदेश दिलेला आहे. या न्यायालयीन आदेशानुसार संबंधित जमिनीच्या ताब्यामध्ये अडथळा निर्माण करू नये, असे स्पष्ट निर्देश असल्याचा दावा उपोषणकर्त्यांनी केला आहे. मात्र, न्यायालयाच्या मनाई हुकुमाचा अवमान झाल्याचा आरोप करत संबंधित तत्कालीन तलाठी बी. एम. मोरे आणि तत्कालीन तहसीलदार, जालना यांच्यावर प्रशासकीय तसेच कायदेशीर स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच न्यायालयाच्या आदेशातील डिक्रीनुसार सदरील गायरान जमीन उपोषणकर्त्यांच्या नावे नियमानुकूल करून देण्यात यावी, अशी प्रमुख मागणीही करण्यात आली आहे. न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करून जमिनीचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली आहे. या मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास उपोषण सुरूच ठेवण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या आमरण उपोषणात संजय साहेबराव सरोदे,समाधान धोंडीराम साळवे, चत्रभुज शिवाजी साळवे, निवृत्ती रामभाऊ वाहूळ, अंबादास येडूबा साळवे, अण्णा दाजीबा साळवे, नारायण *(पान २ वर)*

# डॉ. प्रियंका सजनराज-सेठिया यांना मानसशास्त्र विषयात पीएचडी प्रदान

**जालना - प्रतिनिधी**

डॉ. प्रियंका साजनराज- सेठिया यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून मानसशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी डॉ. शांताराम रायपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आपले संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण केले. डॉ. प्रियंका सेठिया यांच्या संशोधनाचा विषय ''अल्पशैक्षणिक कामगिरी करणाऱ्या किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या आत्मसन्मान, यशप्रेरणा, विश्वासप्रणाली आणि वर्तन समस्यांवर आरइबीटीच्या परिणामकारकतेचा अभ्यास'' असा होता. या संशोधनातून आरइबीटी या मानसोपचार पद्धतीच्या माध्यमातून



अल्पशैक्षणिक कामगिरी करणाऱ्या किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या मानसिकता, आत्मसन्मान, यशप्रेरणा आणि वर्तनामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यात आला. या यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री राजेश टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, अंकुशराव टोपे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुजाता देवरे, तसेच विभागातील सहकारी डॉ. श्रीपाद गायकवाड, डॉ. अविन अकोलकर, सीमा निकाळजे, प्रा. कुंभकरण, डॉ. विलास वरखडे, आजीसासू रतनीदेवी सेठिया, सासरे डॉ. राजेश सेठिया, सासू सरला सेठिया, पती डॉ. सूरज सेठिया तसेच संपूर्ण सेठिया परिवाराने डॉ. प्रियंका यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बारवले महाविद्यालय ते मोतीबाग; 'हर घर तिरंगा' रॅलीत देशभक्तीचा जयघोष




**जालना - प्रतिनिधी**

मेरा युवा भारत, जालना व , बद्रीनारायण बारवले महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रॅली बारवले महाविद्यालय ते मोतीबाग पर्यंत काढण्यात आली. रॅलीदरम्यान युवक-युवतींनी हातात तिरंगा घेऊन देशभक्तीपर घोषणा देत नागरिकांमध्ये देशप्रेम व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. 'हर घर तिरंगा' अभियानाबाबत जनजागृती करत नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा फडकवावा, असे आवाहन करण्यात आले. रॅलीचा समारोप मोतीबाग येथे करण्यात आला. यावेळी समन्वयक निधी शुक्ला, पवन देशपांडे, जयपाल राठोड, रंजित पडघन यांच्यासह युवक व स्वयंसेवकांची उपस्थिती होती.

# अंबड पंचायत समिती कार्यालयातील स्वच्छतागृह बंद; नागरिकांचे हाल आणि दुर्गंधीने कर्मचारी त्रस्त

अंबड (प्रतिनिधी) : स्थानिक पंचायत समिती कार्यालय, अंबड येथील स्वच्छतागृह मागील काही महिन्यांपासून नादुरुस्त आणि अत्यंत दयनीय अवस्थेत पडले आहे. यामुळे कार्यालयात येणाऱ्या सामान्य नागरिकांना तसेच तेथील कर्मचाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी गटविकास अधिकारी (वर्ग-१) यांना निवेदन देण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पंचायत समिती कार्यालयातील पुरुषांच्या मुतारीची अवस्था अत्यंत वाईट झाली असून ती वापरण्यायोग्य उरलेली नाही. तसेच आतील शौचालय वापरण्यासाठी बंद करण्यात




आले आहे. तेथे पाण्याची कोणतीही योग्य व्यवस्था नसल्याने स्वच्छतागृहात भयंकर दुर्गंधी पसरली आहे.

एवढेच नव्हे तर, दिव्यांगांसाठी देखील येथे कोणतीही स्वतंत्र सोय करण्यात आलेली नाही.

या स्वच्छतागृहातील दुर्गंधी संपूर्ण कार्यालय परिसरात पसरत असल्याने दैनंदिन कामे करताना नागरिक व कर्मचाऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

**स्वच्छ भारत अभियानाचा फज्जा :**

पंचायत समितीमार्फत संपूर्ण तालुक्यात स्वच्छ भारत मिशनची अंमलबजावणी केली जाते. मात्र, खुद्द पंचायत समितीच्या मुख्य कार्यालयातच अशी अस्वच्छता आणि दुर्गंधी पसरली *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.